


गंभीर दृश्यापूर्वीचे हळवे क्षणः
सीमाच्या सेटवर नूतन - बलराज साहनी

नूतनच्या अभिनयाच्या सीमा रुंदावणारा सीमा



दो बिघा जमीनमध्ये
बलराज साहनी आणि
मास्टर रतनकुमार

अमिया चक्रवर्ती यांच्या सीमा या चित्रपटाने नूतनला अभिनेत्रीच्या प्रतिभेचा परिचय घडवला आणि तिच्या कारकीर्दीची वाटचाल धडाक्यात सुरू झाली...

□ इसाक मुजावर

आपल्या रुपेरी जीवनात सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार आठ वेळा मिळवणाऱ्या दिलीपकुमारच्या या पुरस्कार मालिकेची सुरुवात अमिया चक्रवर्तींच्या १९५४ च्या *दाग* चित्रपटाने झाली. योगायोग असा की, त्यांच्याच *सीमा* या दुसऱ्या चित्रपटासाठी १९५५ साली नूतन याच पुरस्काराची पहिल्यांदा मानकरी ठरली. तिने हा पुरस्कार सहा वेळा मिळवला. *सीमा*नंतर तिची तुलना नरगीस, मीनाकुमारी या श्रेष्ठ अभिनेत्रींबरोबर होऊ लागली. त्याअगोदर ऑल्सो रॅनच्या वर्गवारीतील एक अभिनेत्री इतकंच तिचं स्थान होतं. तिच्या आई अभिनेत्री शोभना समर्थ यांनी तिला अभिनेत्री बनवण्यासाठी १९५०साली *हमारी बेटी*ची निर्मिती केली. *हमारी बेटी*नंतर नूतनने *नगिना, आगेश, हंगामा, मालकिन, हमलोग* यासारख्या काही चित्रपटांत भूमिका केल्या. पण तिच्या अभिनयाची कुवत तेव्हा एकदम सामान्य होती आणि तिची शरीरप्रकृतीदेखील एकदम किरकोळ होती. सुरुवातीचे तिचे काही चित्रपट पाहात असताना ही गोष्ट शोभनाबाईंच्यादेखील लक्षात आली असावी. यामुळे १९५४च्या *शबाब* या चित्रपटानंतर त्यांनी तिला चित्रपट व्यवसायापासून काही काळ अलग केलं आणि हवापालट करण्यासाठी स्वित्झर्लंडला पाठवलं. स्वित्झर्लंडची हवा तिला चांगलीच मानवलेली असावी. कारण तिथून भरल्या शरीराने एक नवा लूक घेऊन ती भारतात परतली. अमिया चक्रवर्तींच्या नजरेत यामुळेच ती भरली आणि त्यांनी *सीमा*ची नायिका म्हणून तिची निवड केली. *सीमा*तील तिची भूमिका रिफॉरमेंटरी सेंटरमध्ये राहणाऱ्या एका तरुणीची होती. संपूर्ण चित्रपटात ती नॉन ग्लॅमरस लुकमध्ये एका साध्या साडीत वावरली. *सीमा*मधल्या तिच्या भूमिकेचं हे एक वेगळं वैशिष्ट्य होतं.

*सीमा*त बलराज साहनी नूतनचे नायक होते. पण त्या दोघांची भूमिका काही रोमँटिक नायक-नायिकेची नव्हती. नूतन ज्या रिफॉरमेंटरी सेंटरमध्ये राहणारी तरुणी होती त्याचे प्रमुख होते बलराज साहनी. *दो बिघा जमीन, हमलोग* या चित्रपटांच्यामुळे तेव्हा त्यांचं नाव झालं असलं तरी ते स्टार नव्हते. ही गोष्ट ते स्वतःदेखील ओळखून होते. यामुळे *सीमा*त नायकाची भूमिका अमिया चक्रवर्तींनी

जेव्हा त्यांना ऑफर केली तेव्हा बलराजजी आश्चर्याने म्हणाले, 'मी काही सेलेबल स्टार नाही.' त्यावर 'या भूमिकेसाठी मला कोणी स्टार नव्हे तर ॲक्टर हवाय,' असं उत्तर अमिया चक्रवर्तींनी त्यांना दिलं.

शोभा खोटे ही नायिका *सीमा*मुळे हिंदी चित्रपटात आली. ती महाराष्ट्र राज्य सायकल चॅम्पियन आणि विश्वविद्यालयातील स्वीमिंग चॅम्पियन होती. तिची निवड करताना अमिया चक्रवर्तींनी तिच्यातील हे वैशिष्ट्यच पाहिले आणि *सीमात* सायकल चॅम्पियन तरुणीचीच भूमिका तिला दिली. *सीमा* पूर्वी १९५४ साली अनंत माने यांच्या *शुभमंगल* या मराठी चित्रपटात ती नायिकेच्या भूमिकेत चमकली. पण तो चित्रपट पडला. *सीमा*च्या यशानंतर मात्र हिंदी निर्मात्यांचं लक्ष तिच्याकडे वेधलं गेलं. या चित्रपटातील ही सायकल चॅम्पियन एका चोराचा सायकलवरून पाठलाग करते, असं दृश्य टाकून सायकलिंगमधील तिच्या नैपुण्याचा अमियाजींनी उपयोग करून घेतला. *सीमात* तिच्या तोंडी एक संवाद रिपिट करण्यात आला होता. 'क्या बात है?'. तो त्या काळात इतका लोकप्रिय ठरला होता की रस्त्यावर ती कोठे दिसली तर लोक तिच्याकडे पाहून 'क्या बात है?' म्हणायचे.

अभिनेते सी. एस. दुबे म्हटलं की एका रेपिस्टचा चेहरा आपल्या नजरेसमोर येतो. पन्नासच्या दशकात ते अमिया चक्रवर्तींकडे सहाय्यक दिग्दर्शक होते. १९६१ साली त्यांनी स्वतंत्रपणे दिग्दर्शित केलेला *किस्मत पलट के देख* साफ कोसळल्यामुळे त्यांची दिग्दर्शनाची कारकीर्द संपली. अमियाजींच्या हाताखाली सहाय्यक म्हणून काम करीत असताना त्यांच्या चित्रपटात ते लहान-सहान भूमिका करायचे. *सीमा*मध्ये त्यांनी भूमिका केली होती रिफॉरमेंटरी सेंटरमधील तरुणींच्याकडे वाईट नजरने पाहणाऱ्या एका लोचट माणसाची. या भूमिकेनेच त्यांना लंपट ही ओळख सर्वप्रथम मिळवून दिली.


त्याकाळी मेहमूदचे वडील मुमताज अली बॉम्बे टॉकीजमध्ये नृत्यदिग्दर्शक आणि हास्य अभिनेते म्हणून वावरत होते. बॉम्बे टॉकीजच्या अमिया चक्रवर्ती दिग्दर्शित केलेल्या *अनजान, बसंत, ज्वार भाटा, हमारी बात* चित्रपटांत त्यांनी नृत्यदिग्दर्शन केलं होतं आणि *अनजान* सोडून बाकीच्या चित्रपटात त्यांनी हास्य भूमिकादेखील केल्या होत्या. बॉम्बे टॉकीज बंद पडल्यावर ते बाहेरच्या चित्रपटात भूमिका करून लागले. पण *शहनाई* आणि *सरगम*चा अपवाद वगळता त्यांच्या त्या भूमिकांना विशेष लोकप्रियता मिळाली नाही. यामुळे पन्नासच्या दशकात ते चित्रपट व्यवसायातून एकदम आझाद झाले होते. अमिया चक्रवर्तींनी त्यांना *सीमात* भिकाऱ्याच्या एका छोट्या भूमिकेत घेतलं. इतकंच नाही रफीने गायलेलं 'यह दुनिया गम का मेला है...' हे गाणं त्यांनी लहान मुलांच्याबरोबर पडद्यावर गायलं. ते नृत्यदिग्दर्शक-नर्तक होते. यामुळे त्यांच्यावर चित्रित गाण्यात ते हमखास पडद्यावर नाचताना दिसायचे. *सीमा*तील या गाण्यात ते नाचले नव्हते. त्यांनी न नाचता पडद्यावर गायलेलं हे एकमात्र गाणं असावं.



*अंदाज*मध्ये दिलीपकुमार



*मियां बिबी राजी*मध्ये सीमा



*दाग*मध्ये दिलीपकुमार आणि सहकलाकार

*सीमा*ची कथा अमियाजींचीच होती. त्यासाठी त्यांना १९५५चं फिल्मफेअरचे सर्वश्रेष्ठ कथालेखकाचं परितोषिकही मिळालं. *सीमा*चे संगीतकार शंकर-जयकिशन होते. लताबाईंचं 'बात बात में रुठो ना अपने आपको लुटो ना...' हे गाणं शोभा खोटेवर तर 'सुनो छोटीसी गुडिया की लंबी कहानी...', 'मनमोहना बडे झुठे...' ही गाणी नूतनवर चित्रित करण्यात आली. लताबाईंनी आजवर अनेक अभिनेत्रींसाठी गाणी गायली असली तरी ज्यांच्यावर आपलं गाणं चित्रित झालेलं पाहणं त्यांना आवडायचं अशा अभिनेत्रींत नूतनचं स्थान बरंच वरचं होतं. 'मनमोहना बडे झुठे...' विषयी बोलताना एकदा त्यांनी सांगितलं होतं माझं हे गाणं मी नव्हे तर नूतनने स्वतःच गायलंय असा भास पडद्यावर हे गाणं पाहताना मला नेहमीच होतो. शास्त्रीय रागदारीवर आधारित या गाण्यातील आलाप आणि हरकती नूतननं अचूक पकडल्या हे या गाण्याचं सर्वात मोठं यश म्हणावं लागेल.'

रफीचं 'कहां जा रहा है तू ए जानेवाले...' आणि मन्ना डेने कोरसबरोबर गायलेलं 'तू प्यार का सागर है...' ही गाणी बलराज साहनींवर चित्रित करण्यात आली होती. शैलेंद्र त्याचे गीतकार होते. 'मनमोहना बडे झुठे...' आणि 'कहां जा रहा है...' ही या चित्रपटातील आणखी दोन गाणी शैलेंद्रनी लिहिली होती व 'सुनो छोटीसी गुडिया की...', 'हमे भी दे दो सहारा...' व 'बात बात में रुठो ना...' ही तीन गाणी हसरतनी.

नूतनच्या *सीमा*ने *आलिया भोगासी* या चित्रपटातील नलिनी सराफ नावाच्या तरुणीला पार झपाटलं. इतकं की तिचं नाव बदलण्याचा प्रश्न आला तेव्हा सीमा हे फिल्मी नाव तिने घेतलं. ही सीमा म्हणजे आजची सीमा देव. रमेश देवची पत्नी आणि अजिंक्यची आई. ✻